ब्रम्हानंदांत, आत्मसुखांतच गुंग असत. अहोरात्र त्या फडया निवडुंगातच असावयाच्या. लहर लागल्यास अथवा आईनें फारच आग्रह केल्यास कधीं कधीं हातावर दिल्यास घरीं येत व कांहीं खात. एऱ्हवी खाणें पिणें स्नान करणें बसणें निजणें ह्या सर्व गोष्टी वर्ज्यच. बहुधा गावांत कधीं यायच्याच नाहींत. त्यामुळें त्यांचें दर्शन होणें फारच दुरापस्त असे. ज्या ठिकाणीं स्वतःच्या देहाची पर्वा नाहीं त्याठिकाणीं मातुश्रीची अथवा इतर मंडळीची डाळ कोठून शिजणार. त्यांस त्यांच्या मातुश्री व गांवांतील सर्व लोक, वेडया म्हणूनच म्हणत असत. साधक दशेंतील स्त्री पुरुषांची वृत्ती किंवा सिद्धावस्थेंतील स्त्री पुरुषांची वृत्ती कधीं कधीं–" बालोन्मत्त पिशाचवत् " म्हणजे लहान मुलासारखी, किंवा उन्मत्त ( ज्यास वात झालेला आहे असा ) किंवा पिशाच्या प्रमाणें असते. जगद्वंद्य साधु चूडामणी श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं भगवद्गीतेच्या १३ वे अध्यायांतील सातवे श्लोकावर आपल्या श्री ज्ञानेश्वरींत केलेल्या भाष्याच्या १९२, १९६, १९७, १९८; १९९, २००, २१०, व २१२ ओव्यांत ज्ञानी व साधु पुरुषांचीं लक्षणें दिलीं आहेत. त्यांत हें एक वेडेपण पांघरण्याचेंही लक्षण दिलेलें आहे.

**"चातुर्य लपवी। महत्वहारवी। पिसेपण मिरवी। आवडोनी।"**
**" किंबहुना स्वधर्मी थोर। अवसरीं उदार। आत्मचर्चे चतुर एऱ्हवी वेडा।"**

त्याच प्रमाणें हुबेहुब बन्नुमाईची वृत्ति होती. त्या महाज्ञानी होत्या. पण हें अज्ञानी जनांना कळावें कसें. कोणी त्यांच्या नादीं लागत नसत. इतर गांवचे लोक त्यांच्या दर्शनास आल्यास बन्नुमाई गांवांत कधींच मिळावयाच्या नाहींत. त्या कधीं कधीं कोणास त्या निवडुंगाच्या जंगलातच दिसत. तेथेंही कोणी दर्शनास आले असतां एका निवडुंगाच्या झुडपांतून दुसऱ्या झुडपांत व दुसऱ्यांतून तिसऱ्या झुडपांत वायु वेगानें पळत. निवडुंगांत जाऊन त्यांचें दर्शन घेण्याची कोणाचीही हिंमत होत नसे. दर्शनेच्छू मनुष्याची गांवांतील

लोक टवाळी करीत. व बन्नुमाईची आई त्यांस यथेच्छ गाली प्रदान देत. रत्नाची परीक्षा करण्यास जसे रत्नपारखीच व्हावें लागतें, विद्वानाची परीक्षा करण्यास जसे विद्वानच व्हावें लागतें तसेंच साधूपुरुषाची परीक्षा करण्यास ही साधुवृत्ति व साधुदृष्टी घेऊनच जावें लागतें. ज्यांना नग्नावस्था काय किंवा वस्त्रभूषणांनीं मंडित केलेली कायावस्था काय सारखीच वाटते व ज्या निरंतर आत्मरसाचा आस्वाद घेण्यांत तल्लीन झालेल्या त्यांना ऐहिक विषयोपभोगाची व लौकिकाची काय किंमत !

अशा परम विरक्त साध्वीचें आपल्यास एकवार तरी दर्शन व्हावें अशी प्रबल लालसा एकदां नानासाहेबांस झाली. पण श्रुत असलेल्या बन्नुमाईंच्या एकंदर चरित्रावरून त्यांचें दर्शन घडणें-नव्हे-त्यांचें दर्शन आपल्या मनाप्रमाणें घडणें ही गोष्ट दुरापास्त आहे असें त्यांस वाटूं लागलें. तथापि दर्शन लालसा व अंतःकरणाची तळमळ कमी होईना. प्रत्यक्ष अमोल रत्न जवळ असतां रत्न-कोटींत येण्याच्या मार्गांत असणाऱ्या व कालांतरानें रत्नच बनणाऱ्या हिऱ्या-कडे कधीं कधीं त्यांच्या वर्तनवैचित्र्यामुळे मानवी प्राण्याचें लक्ष अधिक वेधतें. तशीच कांहीं अंशीं नानासाहेबांची स्थिति बन्नुमाईंच्या बाबतींत झाली. कांहीं असो, बन्नुमाईंच्या दर्शनाची इच्छा नानासाहेबांस अनावर झाली. परंतु हें घडावें कसें याबद्दल ते विचार करीत राहिले. विचार करतां करतां त्यांस युक्ति सुचली कीं ही गोष्ट बाबांच्या कानावर घालावी व ते जसें सांगतील तसें करावें. अहाहा ! काय तें नानासाहेबांचें बाबांवरील जननीप्रमाणें निरुप-मेय प्रेम व बाबांचे त्यांचेवरील लहानग्या आपत्याप्रमाणें प्रेम. प्रिय भक्तराज अर्जुन याचे मनांतील आशय अगोदरच जाणून ज्याप्रमाणें ब्रह्मांडाच्या अंतः-करणाचा ठाव घेणारे श्रीकृष्ण परमात्मा त्याचा आशय काय आहे तो त्यास अगोदरच सांगत असत: व विश्वरूप दर्शनासारखेही त्याचे बिकट हट्ट ठिक-ठिकाणीं पुरवीत असत तसेंच इतरांस वाटणाऱ्या गोष्टींचें नानासाहेबांचे हट्ट बाबा सहज लीलेनें पुरवीत असत. बाबांनीं जाणिलें कीं नानासाहेबांस बन्नुमाईंच्या दर्शनाची अनावर इच्छा झाली आहे. अखिल ब्रह्मांडावर ज्याचें

प्रभुत्व अशा देवाधिदेव संतरत्न परब्रह्म बाबांस अशक्य तें काय ? त्यांचा बिनतारेच्या तारायंत्राचा अगोदरच नानासाहेबांस त्यांच्या इच्छेनुरूप दर्शन देण्याचा व ते जसें करतील तसें करून घेण्याचा निरोप बन्नुमाईंकडे जाऊन थडकला. असो. नानासाहेबांनीं बन्नुमाईंस आपली भेटण्याची इच्छा व दर्शन मार्गांत येणाऱ्या अडचणी बाबांच्या कानावर घातल्या. बाबा म्हणाले ' तुला आतां कशास कोणाचें दर्शन घ्यावयास पाहिजे आहे ? येथें सर्व कांहीं नाहीं का ' ! येवढ्यानें नानासाहेबांची समजूत होईना. ते आग्रह धरूनच बसले. बाबा म्हणाले ' बरें तर जा होईल दर्शन. ' याप्रमाणें सद्गुरु मुखवचनामृत प्राशन केल्यावर नानासाहेबांस फार आनंद झाला. व त्यांनीं ही गोष्ट त्यांचे सव्य हात व प्रत्येक कामांत पोक्त सल्ला मसलत देणाऱ्या आपल्या कचेरींतील बाबाखरवंडीकरास सांगितली. व बोधेगांवास जाण्याची तयारी करण्यास सांगितलें. बाबा ( खरवंडीकर ) म्हणाले, 'नानासाहेब यांत तयारी ती काय करावयाची आहे. मनांत येईल तो दिवस ठरवावयाचा व चालूं लागावयाचें. ' नानासाहेब म्हणाले, बाबा तसें नव्हे. अहो बन्नुमाईंकडे जावयाचें आहे. साधुदर्शन घेण्यासाठीं जावयाचें आहे. राजाचे किंवा देवाचे दर्शनास रिक्त हस्तानें जाऊं नये असें शास्त्र आहे. आपल्यास तर देवाच्या देव ज्या बन्नुमाई त्यांचें दर्शनास जावयाचें आहे. जमल्यास त्यांस रांगोळी घालून पाट मांडून त्यांचे आंगास उटणें लावून त्यांस गरम पाण्यानें अभ्यंग स्नान घालावयाचें. नंतर त्यांस सुंदर लुगडें नेसवावयाचें व अंगांत चोळीही घालावयास द्यावयाची. नंतर त्यांची वेणी घालून त्यांस कुंकुम तिलक लावून त्यांचे कंठांत मंगलसूत्र बांधावयाचें, त्यांस खावयास द्यावयाचें व त्यांचे चरणीं वंदन करावयाचें. इतक्या गोष्टी करण्यास ज्या ज्या सामानाची अवश्यकता लागेल तितकें सामान बरोबर घ्यावयाचें. खरवंडीकर बाबा म्हणाले, नानासाहेब बन्नुमाईंची जी कीर्ति ऐकण्यांत येते त्यावरून तुम्ही या सर्व गोष्टी करणार का व बन्नुमाई करवून घेणार का ! बिचाऱ्या खरवंडीकर बाबांस

गुरु-शिष्यांचें इंगित कसें कळणार! ते या सर्व गोष्टींचा उपहासच करूं लागले. नानासाहेब म्हणाले, बाबा तुम्ही म्हणतां ही गोष्ट खरी. मलाही तें कळतें. पण प्रयत्न करून पहाण्यास काय हरकत. मी सांगतों त्याप्रमाणें तुम्ही सर्व तयारी करा. बाबांच्या आशीर्वादानें आपली तयारी व्यर्थ जाणार नाहीं. अहाहा! केवढा हा आत्मविश्वास! व केवढी बाबांच्या शब्दावर निष्ठा! बाबांनीं नानासाहेबांच्या म्हणण्याप्रमाणें सर्व तयारी केली. व बोधे गांवास जाण्याचा दिवस ठरविला. नंतर सर्व सामानासह व बाबाखरवंडीकर वगैरे मंडळीसह नानासाहेब बोधेगांवांत आले व एका देवळांत उतरले. व बन्नुमाईंचा तपास करूं लागले. बन्नुमाई गावांत थोडयाच सांपडणार! तपास करतां कळलें कीं त्या जंगलांत आहेत. नानासाहेब तिकडे जावयास निघाले. बन्नुमाईंचा पत्ता नाहीं. वाटेनें येणाऱ्या जाणाऱ्या कोणा खेडवळास विचारावें तर तो म्हणे कीं ती वेडी बाई आतां त्या निवडुंगात होती. दुसऱ्यास विचारावें तर तो म्हणे ती आतांच त्या लांबच्या निवडुंगांत पळाली. कोणी म्हणत कीं तुम्हाला त्या बाईशीं काय करावयाचें आहे तुम्ही तिच्या नादीं कशाला लागतां. ती तर वेडी पोर आहे. खरेंच बन्नुमाईंचीं किंमत खेडवळास कोठून होणार! उकिरडयावर पडलेल्या हिऱ्यास ते गारगोटीच मानणार. वसुदेव देवकीस ज्याप्रमाणें प्रत्यक्ष परमात्मा पुत्ररूपानें त्यांचे उदरीं येऊन त्यांचे घरीं सतत नांदत असतां हा आपला एक खोडसाळ व अर्वाच्य पोर आहे यापलीकडे कृष्णपरमात्याची किंमत कळली नाहीं, त्याप्रमाणें ही आपली एक वेडी पोर आहे या पलीकडे बन्नुमाईंच्या आईसही बन्नुमाई-सारखें संतरत्न पोटीं येऊन त्यांची किंमत कळली नाहीं. असो. लोक जिकडे जिकडे बन्नुमाईंस आतां आम्हीं पाहिलें म्हणून सांगत तिकडे तिकडे नानासाहेब त्या निवडुंगाच्या कांटेरी अरण्यांत धाऊं लागले. धावतां धावतां फार वेळ झाला. पायांत कांटे मोडले. व शेवटीं थकले. निराशेची छटा त्यांचे मुखावर दिसूं लागली. खरवंडीकर बाबा म्हणाले, नानासाहेब दोनप्रहर झाली. ऊन कडक पडलें. पायांत कांटे बोंचूं लागले. आतां

बन्नुमाईंच्या शोधांत कोठपर्यंत धावणार ! आतां हा नाद सोडून द्या व माघारे चला. बाबांच्या ( महाराजांच्या ) वचनावर अढळ निष्ठा असलेले नासाहेब खरवंडीकरबाबांच्या या निरुत्साही सल्लयास थोडीच भीक घालणार ! नानासाहेबांनीं बाबांचें स्मरण करण्यास सुरवात केली. व क्षणभर डोळे झांकून मनांत म्हणाले, बाबा बन्नुमाईंचें दर्शन व्हावयाचें नव्हतें तर, 'जा दर्शन होईल,' म्हणून तरी आपण मला कशाला सांगितलेंत. बन्नुमाईंचें दर्शन झाल्यावांचून मी येथून हलणार नाहीं. काय वाटेल तें करा. बन्नुमाईंचें दर्शन झालेंच पाहिजे. असें म्हणून डोळे उघडतात तों नानासाहेबांच्या समोर बन्नुमाई नेहमीच्याच नग्नावस्थेंत उभ्या. मग काय विचारतां नानासाहेबांचा आनंद गगनांत मावेना. नानासाहेबांनीं प्रथमतः बन्नुमाईंना वंदन करून त्यांचे अंगांत नखशिखांत भरलेले निवडुंगाचे कांटे काढण्यास सुरवात केली. परंतु बन्नुमाईंची व पवनाची एकच जात. पवन जसा एके ठिकाणीं क्षणभरही रहात नाहीं. व त्यास एके ठिकाणीं क्षणभर थांबऊन ठेवणें जसें सुदुष्कर तशीच बन्नुमाईंची अवस्था. देहावर नसलेल्या व ब्रह्मानंदांत लीन झालेल्या बन्नुमाई केवळ बाबांच्याच आज्ञेमुळें नानासाहेबांसमोर येऊन उभ्या राहिल्या पण बराच वेळ त्या ठिकाणीं त्यांची वाऱ्याची मोट टिकावी कशी. शरीरांतील सर्व कांटे निघणें अशक्य. परंतु नानासाहेबांचें वंदन होऊन अर्धेमुर्धे कांटे निघतात न निघतात तोंच बन्नुमाईंनी पुनरपि जवळ पास असलेल्या गर्द निवडुंगांत पोबारा केला. नानासाहेब खिन्न झाले. त्यांचा आनंद विलयास गेला. खरवंडीकरबाबा म्हणाले 'नानासाहेब झालें इतकें पुरें झालें. आतां बाकीच्या खटपटींत पडण्याची भानगड करूं नका' नानासाहेबांचा स्वभाव हट्टी. पण ते महाराजांच्या जोरावर म्हणाले 'बाबा तुम्ही येथें आपणाबरोबर आणिलेली राहुटी ठोका. भोंवताली कनाती लावा. दोन चार हंडे पाणी तापवून तयार ठेवा. राहुटीचे आंत पाट मांडा. त्याचेभोंवती हरिद्रा कुंकुमयुक्त रंगवल्ल्या काढा, जवळच अभ्यंग स्नानाचे तयारीस लागणारीं सौगंधिक तेलें

व उटणीं ठेवा. बन्नुमाई पुन्हां येतील. निराश होऊं नका. नानासाहेबांची महाराजांवरील अत्युत्कट भक्ति खरवंडीकर बाबांस माहीत होती. त्यांनीं कोणत्याही प्रकारें अनमान न करतां नानासाहेबांच्या सांगण्याप्रमाणें ताबड-तोब सर्व तयारी केली. व नानासाहेबांस कळविलें. परंतु त्या तयारींत चोळी नव्हती. लुगडें होतें. बोधेगांवासारख्या लहानशा खेडयांत चोळी कोठून मिळणार. परंतु बाबांच्या पूर्ण कृपेमुळें नानासाहेबांच्या तयारींत चोळीची तरी उणीव कशी रहाणार ! बोधेगांवापासून थोडयाच मैलांवर असलेल्या एका गांवचा त्या दिवशीं बाजार होता. खेडेगावांतील लोकांच्या सोईसाठीं आठवडयांतून एक दिवशीं खेडयांतील साधारण मोठया गांवीं बाजार भर-ण्याची देशावर फार चाल आहे. त्याप्रमाणें त्या गांवचा बजार आटोपून परत आपले गांवीं जाण्याकरितां एक शिंपी आपल्याबरोबर शिलकराहिलेला माल घेऊन बोधेगावावरून घोडयावर बसून, त्याच वाटेनें त्याच वेळीं जात होता. त्या जगच्चालक ब्रह्मांडनायक नट श्रेष्ठ संतमणी बाबांस कोणतीही गोष्ट तावडतोब उत्पन्न करण्यास अशक्य कसली ! असो. नानासाहेब चोळीची विवंचना करताहेत इतक्यांत खरवंडीकर बाबांनीं नाना-साहेबांस तो शिंपी घोडयावर बसून बाजार करून परत जात असल्याचें सांगितलें. नानासाहेबानीं त्यास लागलीच बोलावून त्यास एखादी चोळी आहे का म्हणून विचारलें. तो म्हणाला होय. एकच चोळी शिल्लक राहिलेली आहे. त्यानें सांगितल्या प्रमाणें त्यास किंमत देऊन नाना साहेबांनीं ती तात्काळ विकत घेतली. व आपल्या तयारींतील येवढेंच भासत असलेलें वैगुण्य काढून टाकलें. आतां सर्व तयारी झाली असें वाटतांच नानासाहेबांनीं पुन्हां क्षणभर डोळे झांकून बाबाचें पुन्हा पुण्य स्मरण करून त्यांची करुणा भाकली. वत्साचा हंबरडा ऐकून कोणत्या धेनूस पान्हा फुटणार नाहीं ! काय चमत्कार ! डोळे उघडतात तों बन्नुमाउली राहु-टीच्या आंत स्नाना करितां मांडलेल्या पाटावर उभ्या. मग काय विचारतां नानासाहेबांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. चंद्रोदय होतांच पुत्रमुख

पाहाण्याच्या अनिवार व अत्युत्कट उत्कंठेनें जशा सागरास भरतीच्या लहरीवर लहरी येऊं लागतात. तद्वतच नानासाहेबांस झालें. त्यांनीं प्रथमतः बनुमाईंच्या शरीरांतील सर्व कांटे काढून टाकिले. त्यांस सौगंधिक तेल व उटणें लाविलें. त्यांचें सर्वांग व केंस घासून काढले व त्यांस अभ्यंग स्नान घातलें. नंतर त्यांचे आंग स्वच्छ पुसून त्यांची वेणी घातली व त्यांचे कंठांत सोन्याचें मंगलसूत्र बांधलें. त्यांस कुंकुमतिलक लावून लुगडेंही कसेंबसें नेसविलें. नंतर मोठ्या मुष्किलीनें व वारंवार विनंति करून काच्चोळीही त्यांचे अंगांत घातली. त्यांची पूजा करून त्यांचे हातावर नैवेद्य ठेवून त्यांस वंदन केलें. व त्यांस दक्षणाही दिली. इतकें सर्व होतें न होतें तों आईसाहेबांनीं ( बनुमाईनी ) त्या सर्व लुगडयांचा, कंचुकीचा, कुंकुमतिलकाचा व हातावर दिलेल्या नैवेद्याचा त्याग करून पूर्ववत् दिशारूप दिव्यांबर परिधान करून. तडक काटेरी निवडुंगाच्या जंगलांत वायुवेगानें निघून गेल्या. ही सर्व बातमी हां हां म्हणतां बोधेगांवांत पसरून बनुमाईंच्या मातुश्रीच्या कर्णपथावर आदळली. बनुमाईंच्या वृद्ध मातुश्री राहुटीजवळ येऊन त्यांनीं त्यांपैकीं कांहीं प्रकार कानांनीं ऐकिला व कांहीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिला. तो अश्रुतपूर्व प्रकार ऐकून व पाहून त्यांनीं नानासाहेबांवर मनसोक्त बालिशपणाचे आरोप करून त्यांस यथेच्छ गालीप्रदान केलें. नानासाहेबांनीं शांतमनानें व परोपरीनें त्यांची पुष्कळ विनवणी केली. व त्यांस खरी वस्तुस्थिति समजाऊन सांगण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु क्रोधाग्नीनें होरपळलेलें त्यांचें मन कशानेंच शांत होईना. "द्रव्येण सर्वे वशाः" अशी जी म्हण आहे ती खरोखर खरी आहे. नानासाहेबांनीं शेवटीं बनुमाईंच्या आईस सांगितलें कीं बनुमाईस अर्पण केलेलें हें लुगडें, ही चोळी, हें मंगलसूत्र, हें फराळाचें व ही दक्षिणा तुम्ही घेऊन जा. रागाऊं नका व विनाकारण आम्हाला शिव्या देऊन भलतेसलते आरोप आमच्यावर करूं नका. आम्ही यापैकीं कोणतीच गोष्ट पापबुद्धीनें केलेली नाहीं. सर्व गोष्टी बाबांच्या आज्ञेनें, सद्बुद्धीनें व परमपूज्य भावनेनें केल्या आहेत. बनुमाईंच्या आई खेडयांत राहणाऱ्या, व निरक्षर, दरिद्री. त्यांना हा सर्व प्रकार विलक्षण वाटणें

अगदीं साहजीकच. यांत त्यांचाही कांहीं दोष नाहीं. तशांतून हा सर्व प्रकार अदृष्टपूर्व. असो. वरील सर्व जिनसा बन्नुमाईंच्या मातुश्रीस मिळाल्यानंतर त्या थंड होऊन त्यांस आनंदही वाटला. दरिद्रावस्थेंतील मनुष्यांस २०-२५ रुपयांची सहज क्षणार्धांत मिळकत झाल्यास त्यांस कां आनंद होणार नाहीं ? असो. बन्नुमाईंच्या मातुश्री याप्रमाणें शांत होऊन वरील जिनसा घेऊन घरीं गेल्या व नानासाहेब आपल्या मंडळीसह गांवांत मुक्काम ठेविलेल्या मंदिरांत गेले. स्नान, संध्या व भोजन वगैरे आटोपून त्यांनीं वामकुक्षी केली. नंतर महाराजांच्या अलोट भक्तवात्सल्याच्या, त्यांच्या इतर साधु संतांवर असलेल्या प्रभुत्वाच्या व बिनतारी तारायंत्राच्या लीलेबद्दल गोष्टी चालल्या. सायंकाळीं नित्य विधी आटोपून फराळ झाला व सर्व मंडळी निजली. नानासाहेब देवळांतील गाभाऱ्यांत गाभाऱ्याचा दरवाजा बंद करून निजले. व पहांटेस परत जाण्याचे वेळीं फिरून बन्नुमाईंचें दर्शन कसें होईल अशा विचारांत अंथरुणावर पडले. व हा विचार करतां करतां त्यांस झोंपही लागली. अखिल विश्वाच्या अंतर्यामीं निवास करणाऱ्या बाबांस नानासाहेबांचें मन कोणत्या विचारांत असतां त्यांस झोंप लागली, हें कसें कळणार नाहीं ? बन्नुमाई कधीं कधीं लहर लागेल तेव्हां आपल्या मातुश्रीकडे येत. व कधीं कधीं त्यांच्याजवळ निजतही असत. त्या दिवशीं रात्रीं बन्नुमाई आपल्या आईकडेच निजावयास आल्या. पहांटे ४ वाजतां नानासाहेब जागे होतात न होतात तों बन्नुमाई नानासाहेबांच्या डोक्याजवळ बसलेल्या. गाभाऱ्यांत दिवा जळत होता. नानासाहेबांस हें पाहून परमाश्चर्य, परमानंद व बाबांच्या लीलेचें परम कौतुक वाटलें. त्यांनीं नितांत प्रेमादरपूर्वक बन्नुमाईंचे पायावर डोकें ठेवून त्यांचें वंदन केलें. वंदन झाल्याबरोबर बन्नुमाई त्यांच्या नेहमीच्या पवनगतीनें तेथून निघून चालत्या झाल्या. बन्नुमाई आपल्याजवळ निजल्या होत्या, त्या इतक्यांत गेल्या कोठें म्हणून बन्नुमाईंच्या आई तपास करूं लागल्या. इतक्यांत त्यांस स्मरण झालें कीं कदाचित् त्या मंदिरांत नानासाहेबांकडे तर गेल्या नसतील. म्हणून त्या मंदिरांत त्यांस पाहण्याकरितां आल्या. तों झालेला सर्व प्रकार नानासाहे-

बांनीं त्यांस निवेदन केला. त्यांसही परम आश्चर्य वाटून त्यांनींही नानासाहेब व बाबा यांच्यामध्यें असलेल्या संबंधाचें कौतुक केलें. व आपल्या बलुमाई इतक्या विलक्षण योग्यतेच्या आहेत असेंही त्यांच्या निदर्शनास आलें. नानासाहेबांसंबंधीं झालेली दुर्बुद्धि लयास जाऊन व त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न होऊन निष्कलंक व शांत अंतःकरणानें बलुमाईच्या आई आपल्या घरीं गेल्या. संतबलुमाईच्या आई म्हणून नानासाहेबांनींही जातेवेळीं त्यांची आणखी द्रव्यदानानें संभावना करून त्यांचा निरोप घेऊन नानासाहेब सर्व मंडळीसह परत नगरास निघून गेले. असो. बाबांच्या आज्ञाधारक, सद्भक्तप्रेमी, निसर्ग निरीच्छ, निस्पृह व विरक्त अशा महा संतसाध्वी बलुमाईस माझा साष्टांग प्रणिपात असो. भक्तचूडामणी नानासाहेबांसही माझा साष्टांग प्रणाम असो. व सद्भक्तांचे कोड बा हट्ट पुरविणाऱ्या व या भवाब्धींतून सहजलीलेनें त्यांस पलीकडे घेऊन जाणाऱ्या त्या परब्रह्म साईजननीस माझा अनंत प्रणिपात असो.

मंदाक्रांतावृत्त.

**मा मा तिष्ठ क्षणमपि मनो जीवकुग्रामदेशे ।**
**सौख्यागारं " शिव " इति पुरं दूरपारे भवाब्धेः ।**
**अस्त्युत्कंठा प्रबल तरणी तत्र चेत्तेऽस्ति गंतुम् ।**
**त्वत्सान्निध्ये वसति कुशलः साइ सत्कर्णधारः ॥**

अर्थः—हे मना, ह्या जीवरूपीं कुग्राम प्रदेशांत ( मी जीव, मी जीव अशी जी निरंतरची भावना हाच कोणी एक जीवरूपी कुग्राम वस्तीचा प्रदेश ) क्षणभरसुद्धां राहूं नकोस ( मी जीव ही क्षुद्र भावना सोडून दे ) ह्यासंसारसागराच्या अत्यंत दूर अशा पलीकडच्या तीरावर केवळ सुखाचेंच भांडारगृह

असें एक " शिव " नांवाचें नगर आहे. त्या ठिकाणीं जाण्याची उत्कंठारूपीं मजबूत नौका जर तुजजवळ असेल तर ( त्या शिव नगरांत सुखरूप नेऊन पोंचविणारा ) तुझ्या जवळच प्रवीण व चतुर असा साई नावाडी रहात आहे ( त्याचा उपयोग करून घे त्याला शरण जा ).

दोन कविता व एक अनुभव मिळून वाक्त्रिदल बिल्वपत्र त्या जगज्जननी साई माउलीच्या चरणपंकेरुहावर अनन्य भावानें व नितांत आदरानें व अत्यंत नम्रपणानें अर्पण करून हा बराच लांबलेला लेख संपवून आपली रजा घेतों.

बाबांचें बाळ.

## श्री. रामकृष्ण नाना वगळ यांजला आलेले श्री साईबाबां-बद्दलचे अनुभव,

## श्री सद्गुरु साईनाथ प्रसन्न.

श्री साईबाबांचा मला आलेला अनुभव मी लिहीत आहें.

माझे परम प्रिय मित्र कै. रा. हरिश्चंद्र पांडुरंगजी पितळे, जे. पी; मुंबई येथील ग्राहाम कंपनींतील सेल्समन, यांचा कालेजांत शिकत असलेला वडील मुलगा थोडया दिवसांचे आजारानें ता. ११ एप्रिल १९१० रोजीं, मृत्यु पावल्यामुळें त्यांजवर दुःखाचा प्रसंग कोसळला, त्यायोगें ते व त्यांचें कुटुंब उभयतां त्या मुलाच्या बायकोस व लहान अर्भकास पाहून, शोक करीत व नेहमीं उदास असत. तेव्हां त्यांचें मित्र कै. रा. रघुनाथशेट तेंडूल-कर जे ग्राहामचेच आफिसांत होते, त्यांनीं साईबाबांचे प्रसिद्ध भक्त ह. भ. प. दास गणू यांचें कीर्तन पितळे यांचे सांताक्रुस येथील बंगल्यांत ता. ६–६–१९१० रोजीं करविलें व तेव्हां पासून त्यांचें आप्त व स्नेही मंडळींत शिरडीस साईबाबा म्हणून कोणी साधुपुरुषाचे दर्शनास जाण्याचा ध्यास लागला, व तो इतका कीं ते नेहमीं "दर्शन दे साईबाबा" असें म्हणत असत. ता. २६-६-१९१० रोजीं मला त्यांनीं सांगितलें कीं ८ दिवसांनंतर १५ दिवसांची शिरडीस जाण्याकरितां रजा मागणार आहें. परंतु दुसऱ्याच दिवशीं ते ऑफिसांत गेल्यानंतर त्यांना बाबांचा ध्यास लागला होता म्हणून त्यांनीं "रजा मागूं नको" "आठ दिवसांनीं रजा माग" व "आजच माग" अशा तीन प्रकारच्या चिठ्या केल्या व त्या घातल्या. त्यांत "रजा आजच माग" अशी चिठी त्यांना मिळाली. फार आश्चर्य वाटलें. कारण त्या दिवशीं रजा मागण्याची त्यांची बिलकूल इच्छा नव्हती. अर्ध्या तासानें अशी

"दर्शन दे साईबाबा" म्हणून एक श्री बाबांवर दास गणू महाराजांचे कै. वा. शिष्य यांचें एक मोठें मधुर पद आहे. पहा श्री साई लीला वर्ष १ लें अ. १२ वा पद नं. १४

मजा झाली कीं रा. नंदराम ( ग्राहाम साहेबांचा स्वतःचा शॉर्ट हँड रायटर ) येऊन त्यांना विचारलें कीं आपण रजा केव्हां मागणार ? उद्यां ग्राहाम साहेब कराचीस जाणार आहेत ते १५ दिवस आफीसांत येणार नाहींत. तेव्हां आजच रजा मागितलीत तर बरें. लगेच ते साहेबांस भेटून त्यांनीं रजा मिळविली व संध्याकाळीं श्री. रघुनाथशेट यांस घेऊन ते पुढील जाण्याचे तजविजीकरतां परभारें वांद्र्यास गेले. आणि काकासाहेब दीक्षित व रा. अण्णांसाहेब दाभोळकर यांस भेटले व रावसाहेब साठे यांजवर पत्र आणलें. रात्रौ नित्याप्रमाणें मी त्यांचे घरीं गेलों तेव्हां मला ही गोष्ट कळली व त्यांचे मुलांनीं ते वांद्र्याहून येईपर्यंत मला बसण्यास सांगितल्याचा निरोप दिला. दहा वाजतां ते आले व मला म्हणाले कीं, आपणास माझ्या संगतीं शिरडीस यावें लागणार. मी सांगितलें कीं हें अशक्य आहे. कारण आमचें आफीस ( एक्झामिनर मरीन आकाउंटस ) कलकत्त्यास नेलें होतें व आम्ही येथें ठेवलेले ७ कारभारी मुंबई गोदीचे कामासंबंधीं ता. २–७–१९१७ रोजीं, मरीन ऑफीसास सामील करण्याचा हुकूम आला होता. व त्याला ५–६ दिवसांचाच अवधी राहिला असल्यामुळें रजा मागण्याचा उपाय नव्हता. परंतु आमचे मित्र म्हणाले कीं " साईबाबांनी तुम्हास संगती आणण्याविषयीं सांगितलें आहे तर रजा मिळालीच पाहिजे. कारण स्वतःचे रजेचा चमत्कार पहा." मी म्हणालों, " तुमचें मजवर प्रेम आहे म्हणून असें बोलतां. कारण जर तुम्ही व मी बाबांना अद्याप पाहिलें नाहीं. तर त्यांना माझें नांव कसें कळलें व तुम्हांस त्यांनीं केव्हां सांगितलें ?" तेव्हां ते म्हणाले कीं,"परत येतेवेळेस आगगाडी वांद्र्याचे पुलावर आल्यावर वाऱ्याच्या झुळकीनें मला थोडी झोंप आली त्यांत स्वप्न पडून त्यांत किंवा कोठून तरी मी स्पष्ट ध्वनी ऐकला कीं, " रामकृष्णास घेऊन ये." तर मग रजा मिळालीच पाहिजे. अनुभव घेऊन पहा. हा सोमवारचा (ता.२७ जून) दिवस होता. व पुढील शनिवारीं ( ता.२ जुलई ) त्यांना शिरडीस जावयाचें होतें. रजा मागण्यास मला धीर होत नव्हता व माझे मित्र रोज रजा मागण्याविषयीं आग्रह करीत. एकदांचे शुक्रवारीं संध्याकाळीं आमचे हेडक्लार्क

( European ) जवळ गोष्ट काढून दुसरे दिवशीं शनिवारीं (ता. २ जुलई) सकाळी आफीसांत गेल्यावर, सोमवार पासून ४ दिवसांची एक्झामिनर साहेबांनीं रजा दिली. याच दिवशीं आमचें ऑफीस मरीन आफीसांत जाणार होतें व रात्रींचे गाडीनें आम्हांस शिरडीस जावयाचें होतें. रजा मिळाली, आनंद वाटला. परंतु मरीन आफीसांत गेल्यावर १ तासानें १२ चे सुमारास कलकत्त्याहून कंट्रोलरकडून कामासंबंधीं तार आली व तें काम माझेजवळ होतें. म्हणून ८ दिवसांनीं रजेवर जावें असें वरिष्ठांनीं सांगितलें. परंतु जाण्याची सर्व तयारी केली आहे तेव्हां एक दिवसाची ( सोमवारची ) तरी रजा असावी. मंगळवारीं आफीसांत येईन अशी विनंती केली व ती साहेबांस मान्य झाली. आम्हीं त्याच रोजीं ( शनिवार ता. २ जुलई ) रात्रौ मुंबईहून निघालों. रविवारीं सकाळीं ८ वाजतां कोपरगांवीं पोंहचलों.रात्रौ बराच पाऊस पडल्या कारणानें गोदावरी नदीला पूर आला होता व गांवांत पाणी आलें होतें तेव्हां लांबचे रस्त्यानें जावें लागलें. तेथील मामलेदार कै. वा. रावसाहेब यशवंतराव मिरीकर आम्हांस भेटले व म्हणाले कीं रा. मदन, आय. सी. एस्. असिस्टंट कलेक्टर, आम्हाबरोबर शिरडीस जाण्यास येणार आहेत असें त्यांस नगराहून पत्र आलें आहे. तेव्हां पुढें जाण्याचें थांबावें असें म्हणून त्यांनीं मोठ्या आग्रहानें आम्हास आपले घरीं नेलें. ( रा. मदन हे आमचे मित्रांच्या वडील बहिणीचे नातू व त्यावेळीं भावी जामात होते. ) रावसाहेबांजवळ मी साईबाबांविषयीं चवकशी केली तेव्हां ते म्हणाले कीं स्वतः त्यांची बुवाबिवांवर श्रद्धा नसते, परंतु या साईबाबांना एकदां पाहिलें कीं पूज्य बुद्धीच उत्पन्न होते व पुन्हा त्यांचें दर्शन घेण्याची इच्छा होते व जरी त्यांची सुधारलेल्या पंथांतलें म्हणून गणना होती तरी गंधफूल वाहिलेली बाबांची तसबीर त्यांचे दिवाणखान्यांत मी पाहिली. रा. मदन १२ चे सुमारास आले, व आम्ही सर्व दोन वाजायचे सुमारास शिरडीस जाण्यास निघालों. रा. मदन यांस दर्शन घेऊन त्याच दिवशीं परत नगरास जावयाचें होतें, परंतु मामलेदार साहेब म्हणाले कीं साईबाबा सांगतील तितके दिवस राहावें लागतें, हें ऐकून

मी घाबरलों. कारण माझे रजेचा एकच दिवस राहिला होता. व रा.मदन यांस नगरास सोमवारीं हजर राहणें होतें. आम्ही ४ वाजल्यावर शिरडीस गेलों. आम्ही १०-१२ मंडळी होतों. रावसाहेब साठ्यांनीं आम्हांस दर्शनास नेलें. त्यावेळीं बाबा मशिदींत डावा हात कठड्यावर ठेवून स्वस्थ बसले होते. जवळ धुनी जळत होती. आम्ही बाबांचे पायां पडून उजव्या हाताकडे वळलों. योगायोग असा आला कीं, भिंती पासून अनुक्रमें प्रथम रा. मदन नंतर मी (घाईनें परत फिरणारी मंडळी) माझ्याखालीं रा. हरीश्चंद्रजी, नंतर धुनीपर्यंत व आमचे पाठीमागें आमची इतर मंडळी रा. माधवराव देशपांडे ( बाबा यांना शामा म्हणत ) हे बाबां जवळच आमचे समोर कठड्याशीं बसले होते. बाबा चिलिम ओढीत ओढीत आम्हांकडे पाहात होते. इतक्यांत रा. देशपांडे म्हणाले कीं "बाबा कलेक्टर साहेब आले आहेत." त्यांनीं "होय" म्हटलें व अचुक रा. मदन यांजकडे मान फिरवून त्यांचे हातांत चिलिम दिली व विचारलें कीं "आपणास आज परत जावयाचें असेल." रा.मदन यांनीं "होय" असें उत्तर दिलें. तेव्हां बाबा म्हणाले कीं "गेलें पाहिजे, आपल्यावर सरकारी जोखीम आहे." मी बाबांना विचारणार तोंच आमचे मित्र त्यांचे पाया पडले. त्यांना बाबा म्हणाले "तुझ्या मंडळीस मी ओळखतों. तुझ्या आईनें मागें तुला दर्शनास आणलें होतें ( म्हणजे अक्कलकोटास आमचे मित्र लहान असतांना यांची मंडळी मागें गेली होती हें दर्शविलें ) आणि सांगितलें कीं "आज निराळा स्वयंपाक न करतां साठ्यांचे वाड्यांतला प्रसाद घ्या मग उद्यांपासून स्वतंत्र करा." माझ्या रजेचा एकच दिवस शिल्लक राहिला. पुढें कसें काय करावें हा विचार माझ्या मनांत येऊन मी बाबांचे पाया पडलों. बाबांनीं माझ्या पाठीवर हात ठेवून म्हटलें "घाबरतोस काय स्वस्थ ऐस" मंडळींना याचा अर्थ समजला नाहीं. परंतु अंतरसाक्षी बाबा पाहून माझे डोळ्यांत आनंदाश्रु आले व म्हणालों—बाबा आम्ही नोकरीचीं माणसें. तिजवर आमची उपजीविका, तशांत सरकारी नोकरी—बाबा म्हणाले "कांहीं चिंता करूं नको." सर्व मंडळी आतां वाड्यांत प्रसाद घ्या जा." आम्हीं सर्व

उठलों इतक्यांत आमचे मित्रांचा ३ रा मुलगा चि. द्वारकानाथ, ज्यास केंव्हां केंव्हां वायूचे " फिटस् " येत असत, त्यास त्यावेळीं बाबांचे सन्निध जोराचा झटका आला व तो धुनींत पडला असता पण मंडळीनें सांवरून धरला. मंडळी घाबरली. आई रडायला लागली. बाबा म्हणाले, "घाबरूं नका अल्ला मालिक अच्छा करेगा" व धुनींतील उदी बाबांनीं त्याचे कपाळास लावली. मुलगा बरा झाला व तेंव्हांपासून त्याचा हा रोग गेला. व वडीलांचे पाठीमागें लग्न होऊन सध्यां यांस २ मुलें असून धाकटे बंधु रा. चंद्रकांत यांसह आपल्या मातोश्रीचे आज्ञेंत वडीलांचे इस्टेटीचा उपभोग घेत आहे. सोमवारीं सकाळीं आम्ही दर्शनास गेलों आमचे मित्रांनीं बाबांची पूजा केली व आमच्या भाच्यानें ( केडगांव श्री नारायण महाराजांचे भक्त ) प्रेमळ सुरांत आरती म्हटली. बाबा आनंदांत ऐकत होते. आरती, मंत्रपुष्प झाल्यावर बाबा म्हणाले, " आतां पाऊस पडेल सर्वजण आपल्या ठिकाणीं जाऊन बसा बाहेर पडूं नका. " आणि खरोखर तेथें कांहीं वेळांनीं पाऊस सुरू झाला. दोन दिवस पाऊस होता. आमचे कपडेही वाळत नसत. आम्ही दर्शनास दोन वेळां जातच होतों. बुधवारीं जेव्हां दर्शनास गेलों तेंव्हां बाबांनीं सांगितलें आतां मुंबईस जा. त्याप्रमाणें आम्ही सर्व जेवण उरकून शिरडीहून बाबांचा पुन्हा आशिर्वाद घेऊन दोन प्रहरीं ३ वाजतां निघालों. व संध्याकाळचे वेळेस कोपरगांवास आलों. त्यावेळीं मामलेदार यशवंतरावसाहेब नदीवर फिरावयास आले होते तेथें त्यांची गांठ पडली. आम्हास पाहून त्यांस आश्चर्य वाटलें व आम्ही त्यांना आगाऊ कांहींच सूचना पाठविली नाहीं म्हणून प्रेमानें जरा रागावले व रात्रीं स्टेशनावर मुलांमाणसांसह जाऊं न देतां आपल्या घरीं नेऊं लागले. परंतु आम्ही थोडा संकोच जाणवितां त्यांनीं तेथें नदी जवळ नवीन बांधलेल्या हास्पीतलांतील बंगल्यांत आमची रात्रौ राहाण्याची उत्तमप्रकारें सोई केली. दुसरे दिवशीं अनायासें गुरुवारही होताच. त्या दिवशीं सकाळीं श्री गोदावरीचे घांटावर स्नान व दत्तदर्शन घेऊन ८ वाजल्यावर आम्ही सर्व निघालों. व ८–५५ ची गाडी गांठली व मनमाडहून १२ चे गाडीनें मुंबईस

रात्रौ ८-३० वाजतां पोंहचलों. दुसरे दिवशीं आफीसांत गेलों. वरिष्ठानें इतके दिवस रजेवर राहिल्या संबंधीं कांहींच ठपका दिला नाहीं. जणूंकाय चार दिवसांचीच माझी रजा कायम होती. व कामाबद्दलही घाई दाखविली नाहीं व जें काम माझे रजेंत व्यत्यय आणित होतें त्यांचें उत्तर पुढें १५ दिवसांनीं कलकत्यास पांठविण्यांत आलें.

२ श्री साईबाबांचे दर्शनास जाण्याचा दुसरा योग आमचे मित्रांनी लवकरच आणला. तो इस्टरचे सुटींत. त्यावेळीं आम्ही सडेच होतों. ते व त्यांचा दुसरा मुलगा ( कै. वामनराव ) आणि मी व माझा वडील मुलगा मदन ता.१३ एप्रिल १९११ गुरुवारीं कलकत्ता मेलनें निघालों. बोरीबंदर स्टेशनवर आमचे मित्र रा. बाबुलशाम सेट वैद्य व माझे एल्फिन्स्टन हायस्कूलांतील स्नेही रा. पांडुरंग पाटील, जे सध्यां "हरेराम" नांवानें प्रसिद्ध आहेत त्यांची सोबत मिळाली. आम्ही सर्व सकाळीं शुक्रवारीं शिरडीस पोंहचलों. काकासाहेब दीक्षित त्यावेळीं तेथेंच होते व त्यांचेच नवीन वाड्यांत आम्ही वस्ती केली. तेथें अण्णासाहेब दाभोळकर व श्री. रघुनाथजी भेटले. बाबांचें दर्शन घेतलें. शनिवारीं बाबांची आज्ञा घेऊन शिरडीहून रा. बाबुलशाम सेट वैद्यासह आम्ही दोन प्रहरा नंतर निघालों व रात्रौ १२-३० चे गाडीनें मनमाडहून रविवारीं सकाळीं मुंबईस आलों. रा. पाटील आमचे संगतीं आले नाहींत. शुक्रवारीं बाबांचे दर्शनास आम्ही गेलों तेव्हांच ते तेथें रमले. बाबांनी त्यांस हाकललें, कांठीनें मारलें तरी तेथेंच राहिले. इतक्यांत त्यांनीं तेथें बाबावर कवनहीं केलें. शनिवारी निघतांना संगतीं येण्याविषयीं मी पुष्कळ बोललों, तरी ते आले नाहींत व मला म्हणाले "सब छोड दिया रे, आतां बाबांना पकडलें आहे." त्यानंतर मुंबईंत जेव्हां त्याची माझी भेट झाली त्यावेळीं त्यांस साईबाबांचे पोशाखांत पाहिलें.

सारांश—वरील भेटीवरून हें लक्षांत घ्यावयाचें कीं ज्याना बाबांचा ध्यास लागला त्यांना त्यांचें कसें दर्शन मिळत असे. व बाबा अंतरसाक्षी

असून संकटें कसे टाळीत ही साक्ष पटते. बाबांचे अनेक मंडळीला जे जे अनेक अनुभव आले आहेत, त्यावरून बाबा हे अवतारी पुरुष होऊन गेले हें सत्य होतें.

| | |
|---|---|
| जुनी सोनापुर गल्ली माधवशेट आळी घर नं. २२-२४ मुंबई. ता. २४ सेप्टेम्बर १९२६. | रामकृष्ण नाना वागळ. सरकारी पेन्शनर. |

## रा. रा. पुरुषोत्तम रघुनाथ उर्फ दाजीसाहेब अवस्ती बी. ए., एलएल्. बी. न्यायाधीश यांचे श्रीसाईबाबांबद्दलचे अनुभव:-

### श्री साईनाथ.

कृ. सा. न. वि. वि. श्री मत्सद्गुरु साईनाथ [illegible] यांसंबंधीं अनुभव लिहून पाठविण्याविषयीं आपलें कृपापत्र आलें तें [illegible]. [illegible] थांचे विषयीं अनुभव लिहिणें म्हणजे अत्यंत कठीण. क्षणोक्ष [illegible] व आपआपले वृत्तीचे ठिकाणीं प्रत्येकास, "जया मतीं जैसा भाव [illegible] अनुभव" या उक्तिप्रमाणें देत होते; व अजूनही देत आहेत. माझा [illegible] अनुभव माझेपेक्षां माझें बाह्य कृतीचे साक्षी असलेले लोक जास्त [illegible] व योग्य तऱ्हेनें लिहूं शकले असते. परंतु आपले आज्ञेप्रमाणें मला जें दिसलें—भासलें तें लिहून पाठवित आहें.

श्री साईनाथांचें दर्शनीं जो अनुभव आला त्याची हकीकत लिहिण्यापूर्वी माझा पूर्ववृत्तांत संक्षिप्त प्रकारें देतों; म्हणजे पुढील आलेल्या अनुभवाची ओळख पटणें सुलभ होईल.

अगदीं लहानपणीं आनुवंशिक संस्कारामुळें मी साधारण देवभोळा होतों. परीक्षासमयीं किंवा संकटसमयीं ईश्वराची सकाम प्रार्थना, यथाशक्ति नवस करून इतर लोकांप्रमाणेंच कामपूर्ती होतांच देवाला मात्र विसरून जात असें. मात्र इच्छेप्रमाणें न झाल्यास देवास दोष न देतां आपलें दैव म्हणून स्वस्थ राहात असें. कालांतरानें ईश्वरविषयक जिज्ञासा होऊन ग्रंथ पाहूं लागलों.

तसेंच साधुसंताचे संगतीनें परमार्थ विषयाची ओळख व्हावी या हेतूः प्रज्ञ आणि नामांकित साधू भेटतील त्यांचें संगतींत वेळ घालवूं लागलों.

सन १८९८ मध्यें वयाचें २८ वे वर्षी धोंडी महाराज पळूसकर या साधुवर्याचें दर्शन घडलें. तेथें " उपदेक्ष्यं—तिते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्व दर्शिनः " या भगवद्वचनानुसार मनोमय शरण जाऊन त्या ब्रह्मरुप महात्म्यापासून कांहीं ज्ञानप्राप्ती करून ध्यावी म्हणून एक दिवस त्यांचे सहवासांत घालविला. नमस्कार करतांच " ब्राह्मण असून नमस्कार करतो, देवाला नमस्कार कर " असें धोंडी महाराज म्हणाले. देव पाहूं गेलों तर त्यांचीच तसबीर. "देव व मी ( धोंडी महाराज ) एकच; तत्त्वमसि " असाच त्यांचें वचनाचा भावार्थ अशी खूणगांठ बांधून पुढें असेच मनोमय प्रश्नोत्तराचे मासले अनुभवले. एके वेळीं " आपणांस [illegible] हक्कि आली कोठून ? " हा प्रश्न मनांत येतांच " रामराम सीताराम " पाटील म्हणा म्हणजे बरें होतें असा जबाब आला. झालें तत्काळ त्यांना शरण जावें असें वाटलें परंतु विद्वत्तेचा अभिमान आणि लोकापवादाची लज्जा या दोन विकारांनी [illegible] होऊन तो विचार ठायींच राहिला.

पुढें संत भेटले तर [illegible] घेऊं आपलें मनोगत सांगून उत्तराची वाट पाहावी असा क्रम सुरू [illegible] अशी कीं त्यांतही समाधान पावून वृत्ति थोडी थोडीं स्थिर होऊं लागली. [illegible]च्या निर्व्याज व आत्यंतिक प्रेमानें मन त्यांचेकडे आकर्षित होऊन श्रद्धाही वाढूं लागली; आणि ईशकृपेनें संतदर्शनेंही होऊं लागलीं.

त्याच वर्षी पुण्यास (माझेंच गांवीं) एक तरुण स्त्रीसंतांचें दर्शन घडलें. तीच पुढें माझी गुरुमाउली म्हणून मी मानूं लागलों. ग्रंथ वाचून त्यांचेकडे जावें तों जी जी शंका मनांत ग्रंथवाचनानें यावी तिचा तिचा आपण स्वतःच उल्लेख करून समाधानही करावें. असें नेहमीं होऊं लागलें. त्यामुळें त्यांचे चरणीं निष्ठा बळावली. पण दंभामुळें धोंडीमहाराजांकडे जो प्रकार झाला तोंच येथेंही होऊं लागला. परंतु त्यांनांच दया आली; आणि एक गणेशचतुर्थीचे सुमुहूर्तावर त्यांनीं मला कृतार्थ करून शिवपंचाक्षरी मंत्राचा उपदेश दिला.

तीन चार वर्षांनंतर माझें गुरुमाउलीचें देहविसर्जन झालें, परंतु तत्पूर्वी पुढेंही दर्शन होईल असें आश्वासन मला दिलें. याच नादांत त्यांचें कृपेनें " कई ऐसें भाग्य लाहतां होईन, अवघें देखे जन ब्रह्मरुप " अशी तळमळ लागून त्यांचें पूर्ण कृपेचा अधिकारी कधीं होईन अशी वाट पाहात बारा वर्षे घालविलीं.

सन १९१४ ची गोष्ट. इंदूरास माझे स्नेही बाळासाहेब रेगे भेटले. श्री साईबाबाविषयीं माझे पूज्य स्नेही कै. वा. काकासाहेब दीक्षित त्यांचे कडून माहिती झाली होती. परंतु माझे गुरुमाउलीनें " संताचे दरबारीं जाऊन फजीत पावूं नको " असें सांगितल्यामुळें बाबांचें दर्शनास जाण्याचें धारिष्ट होत नसे. बाळासाहेब रेगे भेटल्यावर कांहीं दिवसांनीं मात्र तिकडे जाण्याची ओढ मनास लागली. अखेर नाताळचे सुटींत जावें असें ठरलें. माझे मनांत पंढरीस जाण्याचें होतें; परंतु बाळासाहेब रेगे यांनीं शेवटीं शिरडीसच यावें असा आग्रह केल्यामुळें तिकडेच गेलों. सुटींत काम शिल्लक राहिल्यास जाऊं नये असा वरिष्ठांचा हुकुम आला परंतु बाबांचीच कृपा कीं; सर्व व्यवस्था लागून आम्हीं तारीख २३ डिसेंबर १९१४ ला सायंकाळीं गाडींत तर बसलों.

त्यावेळीं लढाई सुरू असल्यामुळें वेळ प्रसंगीं फौजी लोकांसाठीं इतर उतारूंस गाडीबाहेर उतरून जागा केली जात असे. आम्ही महू स्टेशनवर येतांच आम्हालाही रेल्वे कंपनीचे एका नोकराकडून उतरण्याचा हुकुम मिळाला. आम्ही सामान बांधतों इतक्यांत एक गोरा पलटणीचा अधिकारी येऊन इंग्रजींत " अहो या गृहस्थांना उतरूं नका. राहीनात का ते " अशा अर्थाचें बोलून त्यानें आम्हाला बसूं दिलें. आणि दुसरे दिवशीं आम्ही शिरडीस पोहोंचलों.

पोहोंचतांच आम्ही तिघे ( बाळासाहेब रेगे, बापु भैय कोठारी व मीं ) बाबांचे दर्शनास गेलों. जातांच " कोण बरोबर आले आहेत " हा प्रश्न

केला. आणि त्यांनीं आमचेकडे बोट दाखवितांच " कशाला आले पिसाट " असें बाबा म्हणाले. पुढें दोनप्रहरीं बाबांनीं आम्ही निघालों त्या अडचणी व गाडींतला प्रकार जणूं काय डोळ्यांनीं पाहिला अशा तऱ्हेनें वर्णन करून सर्व-साक्षित्वाची जाणीव दिली. ते म्हणाले, " माझ्या पोरांना त्रास देऊं लागले, उतरो उतरो म्हणून गाडींतून उतरूं लागले. मग म्यां म्हटलं नका उतरूं माझ्या पोरांना. "

मशिदींतून निघून श्री राधाकृष्ण आईकडे गेलों. तेथेंही " बाळू भलते भलते मोठे लोक माझ्याकडे नको आणूं " असें आई रा. बाळासाहेब यांना म्हणाल्या. काय अगाध प्रेम त्या बोलण्यामध्यें. दोन्हीकडील प्रकार पाहून बुद्धि स्तंभित झाली आणि विचारा विचारांतच अर्धवट जागृतींत रात्र गेली.

दुसरे दिवशीं बाबांचा नैवेद्य श्रीराधाकृष्ण आईच्या " शाळेच्या " अंगणांत सर्व मंडळी तयार करूं लागलो. मनांत मोठेपणाचा ताठा असतांही बरोबरीची मंडळी स्वयंपाकास लागली म्हणून मीही त्यांना मदत करण्यास गेलों. इतक्यांत श्री राधाकृष्ण आई बसल्या होत्या तिकडे नजर जातांच त्यांचे माझ्यापूर्वी वर्णिलेल्या गुरुमातेचे शब्द व वर्तन दिसूं लागलें. माझ्या गुरु-माउलीचे जागीं दुसरें कोणीही मी मानणार नाहीं असा दृढ संकल्प केला; परंतु वृत्ति बेफाम झाल्यामुळें आईकडेसच पाहूं लागलों तों त्या " मेले " म्हटल्याचें माझे कानीं पडलें. माझे दृष्टीनें यांनीं देहत्याग केला अशी माझी भावना होऊन मी लागलाच पुढें धावलों आणि त्यांचें शिर मांडीवर घेऊन शिवपंचाक्षरी मंत्राचा जप करूं लागलों. माझी गुरुमाई व तुम्ही एकच, दे[illegible] बुद्धीनें भ्रम झाला असें म्हणालों, पुढें सर्व पूर्ववत् होऊन नैवेद्य पुरा झाला. पुरंदरे व त्यांचें कुटुंब यांनी तो अपुरा राहिलेला शिऱ्याचा नैवेद्य पुरा करून ठेवला होता. श्रीमंतांकडे ते गरम भगोणें घेऊन निघालों तों वाटेंत उष्णतेनें हात जळून व ओझ्यानें व ग्लानीनें शक्तिपात होऊन छातीपर्यंत वर उचललेला नैवेद्य छातीस चटका देऊन हातांतून सुटला. बरोबर कोठारी होते. त्यां[illegible]

वेद्य तर पुढें नेला; पण उडालेला नैवेद्य कुत्र्यानीं खाल्ला. नैवेद्यास भूमी- स्पर्श रस्त्यांत झाला यानें मन उद्विग्न झालें; तों धोतराचे सोग्यांत पडलेला लिंबाएवढा नैवेद्याचा गोळा हातीं आला. तो हातांत घेऊन मशिदींत पोंहचलों. बाबा भोजनास बसले होते. फकीरबाबा जवळ होते. कोण, काय वगैरे बाबांचें व त्यांचें सांकेतिक भाषण होऊं लागलें. पुन: अभिमान पिशाच्च जागृत झालें, व मनांत म्हटलें, तुम्ही व तुमच्या शिष्यानीं ( आईनीं ) आमचा गुरुमंत्र जो आज सोळा वर्षें गुर्वाज्ञेप्रमाणें गुप्त होता, तो प्रकट छलानें करविला. वगैरे वितर्क सुरू झाले. बाबा हंसूं लागले व मग रागावले, साधन मंत्र, गुरूस व गुरुमार्गास मन मानेल तशा शिव्या देऊं लागले. आमचे परम गुरूसही ढोंगी वगैरे म्हणूं लागले, व आपण स्वत: ईश्वर साक्षात् नारायण असें म्हणूं लागले. मी मनांत म्हणालों ही संधी बरी आहे. एक तर गुरुमार्गाची युक्ति करून घ्यावी, किंवा यांची ही भ्रष्टता आपलेप्रमाणें करावी असें योजून मग एक कल्पना मनांत येऊन पिंड हातावर घेतला. व मनांत मंत्र म्हणालों, "हा पिंड माझे पूर्वजांचे व गुरुपरंपरेचे नांवानें विष्णु स्वरूपी म्हणणाऱ्या तुम्हांस मी अर्पण करितों. तो तुम्ही स्वत: हातावरून उचलून घेतला पाहिजे, म्हणजे भलत्यास दिल्याचें पातक मला नको व अनधिकारी असून घेतल्याचें पातक तुम्हास व तुमचे गुरुपरंपरेस लागेल." बाबा हंसले व "ही कुठली पीडा बुवा ! हा तर शिव्या देतो. आपल्याला नको हे" वगैरे अर्थाचें कांहीं बडे बाबांशीं बोलले. बडे बाबा म्हणाले, "लेना तो पडेगा. तुमारा पेट बडा है लेलेयो बापू." झालें होय नव्हे करतां करतां ४-५ मिनिटांनीं पिंड डावे हातानें उचलला व प्रसाद म्हणून त्याच हातानें अगर उजव्या हातानें परत दिला. मशिदींत हा तमाशा पाहण्यास बाया, माणसें व मुलें यांची अतोनात गर्दी असावीसें भासलें. पुढें जेवण झालें. उदी दिली व आईकडे नेण्यास रेगे आले ते घेऊन गेले. तेथें जेवण चालू होतें. पुन: संशय पिशाच्च स्फुरलें. पुन: वाटलें, "हा प्रसाद यांना खाऊं घालावा. म्हणजे बरें वाईट याचे व आपले गुरुमार्गाचे एकच होईल" असें मनांत आणून

तो उदीमिश्रित प्रसाद ताटांत मध्यंतरीं ठेवला. व "आई व रेग्यानें एकेक भाग घ्यावा व तिसरा आपणास ठेवावा" अशी धारणा मनांत केली. झालें आई रेग्यांस म्हणतात, "बाळा मोठी पंचाईत आहे बाबा. आतां यास घ्या" असें म्हणून त्यानींच तीन विभाग केले व दोघांनीं दोन यथाक्रम उचलल्यावर तिसरा मी घेतला व असा भाव केला कीं, आपण याचें संगतीनें सपिंड होऊन मिश्रित झालों. आईशी कृत्रिम पण स्वाभाविकासारखें कमीपणाचें नातें लावून लडीवाळपणा व लगटपणा सुरू केला. तिनें झिटकारिलें. तेव्हां थोडा थांबलों. जाल्यावर मालकाचें दळण तिच्याबरोबर दळलें व रात्रीं तिच्याबरोबर प्रसाद घेऊन तेथेंच निजलों. तत्पूर्वी निजावयाचे वेळेस आई, रेगे, वगैरे सर्व निजल्यावर झालेलें कार्याचें सिंहावलोकन करीत बसलों. पुनः प्रकट केलेलें मंत्राचें सामर्थ्य नष्ट झालें, या भावनेनें पछाडलें. "....नमःशिवाय" या पंचाक्षरी मंत्राचा उच्चार करतांच श्रीगजाननाचें दर्शन छायारूपांतर झाल्याचें भासलें. ".......शिवायनमः" म्हणतांच शंकर अर्धांगी पार्वतीसह प्रकट झाल्याचें भासलें, वाटलें कीं, "किमियातर नाहीं !" बाहेर रोहिला शिव्या देत बसला होता. तो हंसला व म्हणाला, "किमिया नाहीं तर काय ? अरे मलाहीं असेंच फसवलें व जो येतो त्याला फसवतात. हा ठगाचा बाजार आहे. फसूं नको. सावध रहा." इतक्यांत आई जाग्या झाल्या, म्हणाले, "पुरे चावटपणा. या निजा." अशी या दुसरे रात्रीची कथा आहे. पहिले रात्री आईनीं उत्तम प्रेमळ भजन केलें होतें. तिसरे दिवशीं व चवथे दिवशीं विशेष कांहीं झालें नाहीं. काकआरतीस गेलों तो जाऊन बाबांच्या पायावर डोकें ठेवलें. ते म्हणाले "अरे ... पिशाच्च." झालें. जीव भांबावून गेला. "पिशाच्च" म्हणजे काय ? "भूत" का "योगी ?" घटकेंत वाटे हा, घकेंत वाटें तो. हा म्हणावा तर मनाचें समाधान नाहीं. तो म्हणावा तर "विठ्ठल विठ्ठल वगैरे नवीन भजन जुनें भ्रष्ट मंत्राचे जागीं किंवा "हरी मजवर गुलाल झोंकीतो याच्या गुलालाचा

ार माझी कबरी झाली लाल " या व अशा भजनांत तल्लीन होऊन आपण कोठें आहोंत व काय करतों कांहीं समजेना. पांचवा दिवस उगवला. एकादशी होती. नाताळची सुटी. गोगे मामलेदार व शेखदार वाईहून आल. आई जवळ लडीवाळ पणा चालला. जोग आले तेंच करीत. बापूसाहेब भाटे आले. तेंच. जो आला तो, तात्या पाटील वगैरे--तसेच.अशा नादांत आपणांस आईशीं बोलण्यास फुरसत नाहीं. " आतांपर्यंत झाले ते मनोदय कदाचित चुकलें नसेल कशावरून ? लोक म्हणायचे बोला फुलास गांठ. तसें आपण चिंतावें. कांहीं तरी व्हावें. व आपण म्हणावें त्याचा यांत काय अर्थ ? आतां उघड उघड या गोष्टींचा तोंडोतोंडी व समक्ष निकाल लावून घ्यावा. हें उत्तम. अशा भावनेनें एकांत पाहून दुपारीं आईस म्हटलें, " आई १-२ तास एकटी असून तुजजवळ कांहीं बोलण्याचें आहे. " ती म्हणाली, " बरें. " तों डॉक्टर पिल्यांचे पाहुणे आले. सर्व दिवस असाच गेला. मंडळी जमा झाली. चावडीची सुरवात झाली. न बोलूं पावलों. दुसरे दिवशीं सकाळीं तर परत जाणार. पुढें काय चावडीची सर्व तयारी झाली. लोक जमले. सगळे मोरचेल चौऱ्या अबदागिरी वगैरे वगैरे घेऊन रवाना होऊं लागले. इतक्यांत आईची पूजेची मूर्ति तेथें होती. तिकडे लक्ष गेलें. झालें तिकडेच पाहूं लागलों. पाहतां पाहतां टक लागली. बस्स कोणी येवो, कोणी जावो. आपण उभे ते उभे. कोणी चला म्हणे, उत्तर नाहीं. कोणी कांहीं विचारी उत्तर नाहीं. कळे सर्व पण बोलावेंसें वाटेना. आईनें मात्र येतां जातांना जो जो भेटे त्यास तूं आपलें काम कर म्हणून रवाना करावा.झालें स्वारी मशिदींतून चावडींत गेली. मंडळी सामान ठेऊन परत गेली. तरी उभे ते उभेच. आई आल्या. म्हणाल्या, "पुरे आतां. डोळे चोळून बाजूस झालों व आंथरुण घालून निजण्याची तयारी केली. माझें आंथरूण,माझी शाल,सर्व माझें मला पाहिजे. लोकांचें घेणें नाहीं. आपलें देणें नाहीं कोणास शिवून निजावयाचें नाहीं. अशी वृत्ती झाली. भोजन करावेंसें वाटेना. झोंप येईना, मंडळी जेवली, [illegible]ली, झोपी गेली, ११

वाजले सर्व सामसूम झाली. गोगे माझे पलिकडे,रेगे आईच्या अलीकडे. त्यांचे शेजारीं मी. माझे पलिकडे कोठारी.अशी सर्व मंडळी पडलेली.तों उठून बसलों. दिव्याजवळ घडयाळ टांगलेलें पाहिलें तर ११ वाजून गेले. झोंप येईना कळेना आपल्यास काय झालें. आईस हांक मारिली. रेग्यांस उठविलें. जागे झाले व म्हणाले निजा. मी म्हणे झोंप येत नाहीं. ते म्हणत आम्हांस तरी निजूं द्या. होतां होतां वाटलें "आपण मरतों." मृत्यु सन्मूख आला. १२ वाजतां आपला देह विसर्जन होणार. या फकीराचे दारीं येऊन मुलांबाळांस मुकलों. गुरुमार्ग भ्रष्ट झाला. व प्रायश्चित्त म्हणून अमर होणारे आपण मरणार. "झालें आतां करावें काय ? १० मिनिटें राहिलीं. बारावर कांटा येतांच राम म्हणावयाची वेळ." तों धोंडी बाबांचा राममंत्र आठवला. राम म्हणून कबीर मुक्त झाले. शिष्यांनीं प्रेत उठविलें. तो राम म्हणून तर पाहूं. झालें. "राम राम सीताराम" मंत्र सुरू केला. डोळे झांकले. १२ मिनिटांत मरणार; घडयाळाकडे पाहवेना. "राम....राम....राम........" म्हणतां म्हणतां वाटलें बारातर खास वाजून गेले असतील. आपण तर मेलों नाहीं. पाहावें किती वाजले. पाहातों तों १२ मिनिटें वर. धीर आला. वाटलें राममंत्रानें वांचविलें. राम सोडला आहे. येईल. मारून टाकील. झालें. गोगे गोंगाट ऐकून उठून बसले. म्हणाले, "रावसाहेब निजा. आम्हांला निजूं द्या. त्यांना तोंडास येतील त्या शिव्या दिल्या. चोर, लुटारू, ठक वगैरे "ढोंगी भक्त" ढोंगी भक्तांचे आश्रमानें आईसारखे भोळे व आम्हांसारखे सरळ भावडयास फसविणारे" वगैरे. त्यांनीं धोरण ओळखिलें. २४ वर्षांचा भक्त तो. ते म्हणाले. "खरें बुवा. तुम्हीं आमचें ब्रह्म ओळखलें. २४ वर्षांत कोणास पत्ता नाहीं लागला. तुम्ही खरे भक्त." झालें स्वारी चढली हरभऱ्याच्या झाडावर. गोग्यास म्हणाले, माझें वृत्त ऐका. केलें चराट सुरू, तें एक तास चाललें. ते म्हणाले निजा. मी म्हणालों निजलों कीं मेलों. तो फकीर पुनः जादू करील. राममंत्रानें वांचविलें. तुम्ही राम म्हणाल तर मी

निजलों. बिचारा एक तास राम म्हणत मांडीवर डोकें घेऊन बसला. थकला. बंद करतांच उठून बसलों, ते म्हणाले, माझे मित्र आहेत ते बसतील. त्यांना दुसरे खोलींतून आणलें. त्यांचे मांडीवर डोकें ठेवून निजलों. ते " राम " म्हणण्यास कबूल होईनात. म्हणाले, " अल्ला अल्ला " पाहिजे तर म्हणतों. म्हणा बुवा कांहीं उपयोग झाला तर पाहूं. " अल्ला मालीकचा " शब्द ऐकूनही मनास समाधान वाटलें. झोंप लागली. पण त्यांस बजावलें होतें कीं, रामनामाचें प्रहारानें फकिरास दोन वाजतां मारलें आहे. तो जादु-गार उठेल. अल्ला म्हणत रहा. " तो अल्ला म्हणतो आहे, तों ५ वाजतां " अल्ला मालीक है "चा गंभीर ध्वनी व खोकणें कानावर आलें. " अरे बापरे फकीर मेला नाहीं. अरे तो तर साक्षात् नारायण बाबा. शिव शिव हा काय भ्रम झाला आपण त्यांचा अपराध केला.शिव्या दिल्या.देवा माफ करा" म्हणत पडलों. लोक काकड आरतीस गेले. हे चोरा सारखे पडले राहिले आदले दिवशीच " पिशाच्च " म्हणाले ते वेळीं " तूं काकड आरतीस येऊं नको " म्हणून हुकुम झालाच होता. त्याची आठवण होऊन वाईटही वाटलें व जागही पावलों नाहीं. झालें बहिर्दिशेस गेलों. जे झाड पहावें ते ब्रम्ह. जो पक्षी पहावा तो नर असल्यास बाबा व मादी असल्यास आई. ब्रह्म आणि माया. प्रकृति आणि परमेश्वर यांचा भास होऊं लागला. लोक समजत याला भ्रम झाला. तसें कोणी बोलेना. पण त्यांचे वागण्यावरून तसें वाटे. असो टांग्यांत घालून मित्र घेऊन गेले. स्टेशनवर गाडींत बसेपर्यंत वारें होतें. मग झोंप घेतली. सर्व पूर्ववत् झालें असा हा पहिलें दर्शनाचा वृत्तांत. गोग्यांचें उपकार अनंत. पुढें जें झालें तें हरी जाणें. आतां तर वृत्ति कोठें आहे तोच जाणे. विश्वास आहे म्हणावा तर वागणें विपरीत, नाहीं म्हणावा तर पूर्वानुभव निराळा. असो. देव करील तें खरें.

## रा. रा. निळकंठराव सहस्रबुद्धे यांचा अनुभव

सन १९१०–११ मध्यें प्रथम शिरडीस मला श्रींनीं आपल्या कांहीं भक्तांकडून खेंचून नेल्यावर कांहीं दिवसांनीं "आपणासारिखे करिती तात्काळ। नाहीं काळ वेळ तयांलागीं" ही श्री तुकारामाची उक्ति मनामध्यें कांहीं दिवस सारखी घोळत होती. "मला कांहीं सांगावयाचें नसेल, तर मला येथें आणिलें तरी कशाला ?" ह्या प्रश्नाचा गुप्त विचारही चालू होता. कै० रा० भाऊसाहेब दीक्षित ह्यांनीं सांगितलें होतें त्याप्रमाणें रा० माधवराव देशपांडे ह्यांनीं माझ्या परत जाण्याविषयीं श्रींच्या चरणापाशीं पुढें जेव्हां गोष्ट काढली तेव्हां श्री म्हणाले कीं, "त्याला फार घाई झाली आहे. माझ्या जागेवरून मला उठवून त्याला स्वतः बसावयास पाहिजे आहे. अशी घाई करून कसें चालतें. सबूरी पाहिजे." ह्या श्रींच्या बोधात्मक आशिर्वादाचा नित्य अनुभव येत आहे. अशा अतींद्रिय ज्ञानाच्या प्रत्यक्ष अनुभवाचा बोजा डोईजड होई तोंपर्यंत बहुत दिवस मी सतत अनुभव घेतच होतों व अखेरीस त्यांच्या ईशसम अधिकाराची पक्की खात्री झाली, तेव्हां चिकित्साबुद्धि जाऊन तिच्या जागीं अढळ श्रद्धेची स्थापना झाली व तदनंतर मी आपला बोजा बाजूस ठेवून श्रींच्या चरणीं मनःपूर्वक शरणांगत झालों. माझ्यासारख्याची अशी स्थिति झाली तें पाहून कांहीं दुराभिमानी लोकांनीं शिरडीस कधींही न जाण्याचा संकल्प केला.

( खालील अनुभव आमच्या एका अत्यंत विश्वसनीय स्नेह्यानीं आम्हांला कळविला आहे. नांवें प्रसिद्ध न करण्याची त्यांची इच्छा असल्यामुळें आम्हीं तीं करीत नाहीं. सं० )

आमचे स्नेही वयातीत गृहस्थ आहेत व महाराजांचे ठिकाणीं त्यांची निस्सीम भक्ति आहे. त्यांच्या ज्येष्ठ भगिनी सुमारें ७० वर्षांच्या वयाच्या आहेत. त्या पूर्ण धर्मपरायण असून त्यांचा बहुतेक काळ घरांतील देवाजवळ भजन, पूजन, पुराणश्रवण यांत जातो. त्यांचीही आपल्या बंधूप्रमाणें महाराजांवर पूर्ण निष्ठा आहे. रोज नित्य नेमानें महाराजांची पूजा आरती वगैरे त्यांचे कडे होत असते. कांहीं महिन्यांपूर्वीं या बाईंची प्रकृति बरीच बिघडली. आधींच वार्धक्यावस्था व त्यांत दुखण्याची तीव्रता जाणवूं लागली, त्यामुळें त्यांचा धीर सुटला. याच वेळीं त्यांच्या डबींतील महाराजांची " उदी " संपली. व अंतकाळीं आपल्या कपाळीं " उदी " लागावी असा त्यानीं सारखा ध्यास घेतला. घरांत उदी नाहीं. बंधूकडून मागिवली पण ते आपल्या गांवीं बरेच दूर. तेथून उदी येण्यास २–३ दिवस तरी लागणार, बाईनीं तर सारखा उदीचा घोष घेतलेला. अंतकाळीं आपली उदी माझ्या तोंडांत पडावी व कपाळीं लागावी अशी महाराजांची त्या सारखी करुणा भाकूं लागल्या. दोन प्रहरचे वेळीं त्यांना समोरच्या दरवाजांतून महाराजांची स्वारी प्रत्यक्ष आंत येतांना दिसली. लगेच त्या आपल्या चिरंजीवांना व सुनांना म्हणूं लागल्या 'बाबा आले. त्यांना आसन द्या, दर्शन घ्या, पूजा करा.' परंतु मंडळींना तर " बाबा " दिसेनात. त्यांना वाटलें बाईंना वात होऊन त्या भ्रमांत बोलत आहेत. मंडळी ऐकेनात म्हणून त्या फारच अस्वस्थ झाल्या व त्यांनीं थोडावेळ डोळे मिटले. व पुन्हां लगेच म्हणूं लागल्या, " पहा पहा बाबा माझ्या डबींत आपली उदी घालून जात आहेत. जल्दी त्यांचें दर्शन घ्या. " अर्थात् महाराज कोणालाच दिसले नाहींत व बाईंना वात झाला आहे अशी सर्वांची खात्री झाली. आतां त्या डबींतील

उदी माझ्या कपाळीं लावा व माझ्या तोंडांत थोडी घाला म्हणून बाईनी अट्टाहास चालविला डबींत उदी नाहीं हें माहीत असूनही त्यांच्या समाधानार्थ त्यांच्या सुनेनें ती डबी उघडली व महदाश्चर्याची गोष्ट ही कीं ती डबी उदीनें पूर्ण भरलेली होती. सर्वांना अतिशय आश्चर्य वाटलें. व बाई भ्रमांत बरळत नसून सत्य बोलत होत्या अशी सर्वांची खात्री झाली. व आपल्याला महाराजानीं दर्शन दिलें नाहीं म्हणून सर्वजण मनांत अतिशय खट्टु झाले. उदी लावल्यानंतर बाईना उतार पडूं लागला. व हल्लीं त्यांची प्रकृति चांगली आहे. दृढनिष्ठा असली व अनन्य भावानें शरण गेलें म्हणजे महाराज जवळच आहेत. हा बोध ह्या अनुभवावरून घेण्यासारखा आहे.

## रा. रा. काशीनाथ मामा डुबे यानीं दिलेले उदीचे अनुभवः-

रामचंद्र सदोबा मालुसरे हे मामांच्या मंडळींतील एक साईभक्त आहेत. यांचें पटवेकऱ्याचें दुकान आहे. सन १९१८ सालच्या इन्फ्ल्युएन्झा साथीच्या वेळची गोष्ट. रामचंद्राला दुकानांत ताप भरला, म्हणून तो घरीं गेला. दुसरा दिवस गुरुवार होता म्हणून नित्यनियमाप्रमाणें स्नान पूजा उपास वगैरे केला. संध्याकाळीं ताप फार चढला व शुद्ध गेली. रामचंद्राची बायको घाबरून मामांकडे गेली व त्यांना बोलावून आणलें. मामा पाहातात तों रामचंद्र ओसरीवर बेशुद्ध पडलेला. त्यांना स्थिति फार चमत्कारिक दिसली. डोळे उघडून मामांनीं नजर लाविली तों डोळे लाल भडक झालेले व त्यांतून सारखें पाणी वाहतें आहे. मामानीं अनन्य भावानें साईनाथ महाराजांची प्रार्थना केली व बाईला उदी व तीर्थ दिलें. तीर्थांत उदी घालून प्रथम मामांनीं आपल्या हातानें त्याला पाजली व दर तासानें याप्रमाणें देण्यास रामचंद्राचे बायकोला सांगितलें. रामचंद्राला देवघरांत निजविलें व नंदादीप लावला. ३।४ तासांनीं सपाटून घाम निघाला पण त्यामुळें ग्लानी येऊन जीभ वांकडी पडली. तीर्थ व उदी चालूच होती. कांहीं वेळानें त्यानें

डोळे उघडले. व महाराजांच्या तसबिरीकडे पाहून नमस्कार केला. तेव्हां-पासून उतार पडूं लागला. नंतरच्या सोमवारीं मामांच्या मंडळीपैकीं गोविंद-राव पांढरे फुलवाले यांचेकडे महाराजांची पूजा होती. त्यावेळीं स्नान घालून रामचंद्राला तेथें आणावें म्हणून मामानीं त्याच्या बायकोला सांगितलें. शेजारी-पाजारी मंडळीनीं त्याला विरोध केला; परंतु रामचंद्रानें मी जाणार म्हणून हट्ट घेतला. शेवटीं बायकोनें रामचंद्राला आंघोळ घालून गोविंदरावाकडे नेला. त्यानंतर तीन दिवसांनीं रामचंद्र साफ बरा होऊन दुकानावर जाऊं लागला. एवढा घातक आजार पण निव्वळ तीर्थ व उदी घेऊन व महाराजांचे चरणीं दृढनिष्ठा ठेवून रामचंद्र बरा झाला.

१९१९ सालीं गुरु पौर्णिमा झाल्यानंतर काशिनाथ मामा आपल्या मंडळीसह पुण्यास जाण्यास निघाले. कोपरगांवला गाडी चुकली म्हणून धर्म-शाळेंत मंडळी उतरली. तेथें मामांना सडकून ज्वर भरला. तसेंच त्यांना पुण्यास आणलें. नंतर कांहीं दिवस ताप सुरूच राहिला; परंतु मामानीं उदी व तीर्थाशिवाय दुसरें औषध घेतलें नाहीं व नित्य स्नान पूजा पाठ बंद ठेविलें नाहीं. सुमारें १५ दिवसांनीं मामांची प्रकृति फारच बिघडली. सकाळीं त्यांची मंडळी समाचाराला आली व मामांची स्थिति पाहून घाबरली. शंकरराव शिंदे व गोविंदराव पांढरे यांनीं औषध देण्याचें योजिलें; परंतु मामांनीं इनकार केला. व तीर्थ उदीशिवाय दुसरें कांहीं घेणार नाहीं म्हणून सांगितलें. सुमारें अर्ध्या तासानें मामांना रेच व वांती झाली. मंडळी फार घाबरली. मामांनीं सर्वांना भजन करण्यास सांगितलें. त्यांत मामांचा डोळा लागला. पुढें उतार पडत गेला व मामा उदी व तीर्थाशिवाय कांहींही औषध न घेतां बरे झाले.

नंतर १५ दिवसांनीं गोविंदराव पांढरे यांची पाळी आली. मामांच-कडे गुरुवारचा दरबार पूजन भजन वगैरे होऊन मंडळी रात्रीं २

वाजतां बरोबर गेली. मामांचा डोळा लागतो न लागतो तों गोविंदरावांकडून त्यांना बोलावणें आलें. घरीं जाऊन पाहातात तों गोविंदराव फार आजारी व त्यांची माणसें रडताहेत. मामांना गोविंदरावांची स्थिति कठीण दिसली. त्यांनीं प्रथम सर्वांना बाहेर काढलें व गोविंदरावांना उदी व तीर्थ दिलें. मामांस संतलीलामृत मुखोद्गत आहे. तें त्यांनीं म्हटलें व पुन्हां उदी व तीर्थ दिलें. नंतर गुरुगीता म्हटली व तीर्थ उदी दिली. रोग्याला बरें वाटत चाललें. दिवस फटफटला तेव्हां स्थिति पुष्कळ सुधारली. हलके हलके आराम पडत गोविंदराव उदी व तीर्थ घेऊन बरे झाले.

बापूराव शिरसाठे म्हणून मामांचे एक स्नेही आहेत. त्यांचे एक चिरंजीव सदाशिवराव पुण्यास नोकर आहेत. त्यांचा मुलगा तान्हा असतांना अंगावर फोड उठून ते वाहूं लागले. मामांनीं त्यांना श्री साईनाथ बाबांची पूजा करण्यास सांगितलें व फोडावर उदी लावण्यास सांगितली. या उपायानें मुलगा बरा झाला. पुढें गुरुपौर्णिमेला त्या मुलाला शिरडीस आणून महाराजांचे पायांवर घातलें. व त्याचें नांव गोटीराम ठेवलें. पुढें सदाशिवरावांनीं आपले घरीं महाराजांचे तसबिरीची स्थापना केली. नंतर नाताळच्या सुमारास गोटीराम उर्फ गोट्या तापानें बराच आजारी झाला. मुलाची आई त्याला तीर्थ व उदी देऊं लागली. परंतु सदाशीवरावांचा विश्वास तितका दृढ नसल्यामुळें ते म्हणाले, असा कोठें उदी अंगारा देऊन मुलगा तापांतून बरा होतो ! मी डॉक्टरला नांहीं तर वैद्याला आणतों. परंतु बाईचा महाराजांवर दृढ विश्वास. तिनें काशीनाथ मामांना दुकानीं बोलावूं पाठविलें. त्यावेळीं शिरडीचे माधवराव देशपांडे मामांचे दुकानीं बसलेले होते. त्यांनीं दोन पुड्या मामाजवळ दिल्या व मुलाला १०० डिग्रीवर ताप असेल तेव्हां पुडी देण्यास सांगितलें. मामा सदाशीवरावांचे घरीं जाऊन पाहातात तों मुलाचा ताप साफ